**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:15.03.2025** **वार:शनिवार**

---

1. राज्यभरात होळी, धूलिवंदन उत्साहात; रंगोत्सवाचाही जल्लोष
2. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेच्या अंमलबजावणीत राज्य दुसऱ्या स्थानी
3. अक्षय ऊर्जा प्रकल्पांना प्राधान्यानं कर्जपुरवठा करण्यात भारताचा पुढाकार
4. तीनशे पंच्याहत्तरवा बीज सोहळ्यासाठी देहू नगरपंचायतीकडून जय्यत तयारी आणि
5. विदर्भात अनेक ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा इशारा

**होळी-धूळवड**

राज्यभरात काल ठिकठिकाणी होळी नंतर धूलिवंदनाच्याच दिवशी रंग खेळण्याचा उत्साह दिसून आला. महाराष्ट्रातली रंगपंचमीची परंपरा काहीशी डावलत, धूलिवंदनालाच रंग खेळणारी तरुणाई संपूर्ण राज्यभरात दिसून आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विविध पक्षांच्या राजकीय नेत्यांनीही काल रंगोत्सव साजरा केला.

पुण्यात काल भोई प्रतिष्ठानकडून विशेष मुलांसाठी 'रंग बरसे' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये अनाथ, एचआयव्ही बाधित, गतीमंद, दिव्यांग, देवदासी भगिनींची मुलं, डोंबाऱ्याचा खेळ करणाऱ्या मुलांबरोबर रंगोत्सव साजरा करण्यात आला. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीदेखील यामध्ये भाग घेतला.

यवतमाळच्या मारेगाव तालुक्यातल्या बोरी गावात संत गदाजी महाराजांच्या यात्रेत, विदर्भात प्रसिद्ध असलेली गोटमार होळी रंगली. यवतमाळमध्ये बंजारा समाजाचा रंगोत्सव, काल पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

नंदुरबार जिल्ह्यातल्या सातपुडा पर्वत रांगामधील आदिवासींची राजवाडी काठीची होळी काल सकाळी साडे पाच वाजता प्रज्वलीत करण्यात आली, ऐकुया त्याबाबतची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून...........

**नंदुरबार जिल्ह्यातल्या सातपुडा पर्वत रांगामधील आदिवासींची प्रसिद्ध अशी राजवाडी काठीची होळी सकाळी साडे पाच वाजता प्रज्वलीत करण्यात आली आहे. आदिवासी समाजामध्ये या होळी बद्दल मोठी आस्था असल्याने आदिवासी बांधव या होळीला आवर्जून उपस्थित राहतात. 1242 मध्ये काठी संस्थानचे राजे उमेदसिंग यांनी सातपुड्यातील आदिवासी बांधवाना एकत्र करत ह्या काठीच्या राजवाडी होळीला सुरवात केली होती. तेव्हा पासून सुरु असलेल्या विधी परंपरेनुसार ही काठीची राजवाडी होळी साजरी होती. या होळीसाठी आदिवासी बांधव मोरख्या, बुध्या, बावा, ढाणखोर अशी पाळणा धारणकरुन रुप धारण करतात. यात ब्रम्हचर्यचे पालन करुन हे वस्त्र आणि साज चढवलेले आदिवासी बांधव पाच होळी केल्यानतंरच हा साज उतरवात आणि यानंतर स्नान करतात. या काळात ते खाटेवर सुद्धा झोपत नाही. काठी संस्थानच्या होळीनिमित्ताने हजारो आदिवासी बांधव आपल्या याच पारंपारीक वेशभुषेत ढोल, बिजरी, घुंगराच्या तालावर थिरतकांना दिसून आले, आणखीन पंधरा दिवस**

**सातपुड्यात होळीचा ज्वर दिसून येणार आहे. या होळीला पाहण्यासाठी गुजरात, मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्रातील अनेक पर्यटक देखील दाखल झाले होते. विशेष म्हणजे या होळीचा दांडा जर पुर्व दिशेला पडला तर तो आदिवासी संस्कृतीमध्ये शुभ संकेत माणल्या जातो. आकाशवाणी बातम्यांसाठी नंदूरबारहून निलेश पवार.**

दरम्यान, ठाणे जिल्ह्यातील बदलापूर मध्ये रंग खेळून झाल्यानंतर उल्हास नदीत पोहायला गेलेल्या चार अल्पवयीन तरुणांचा काल बुडून मृत्यू झाला. ही सर्व मुले दहावीत शिकत होती.

**अक्षय ऊर्जा**

अक्षय ऊर्जा प्रकल्पांना प्राधान्य क्षेत्र कर्जामध्ये समाविष्ट करून, त्यांना वित्तपुरवठा करण्यात भारतानं पुढाकार घेतला असल्याचं, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी म्हटलं आहे. हवामान बदलामुळे निर्माण होणारे धोके आणि वित्तपुरवठा या विषयावरील एका चर्चासत्रात ते काल नवी दिल्लीत बोलत होते. या धोरणामुळे सौर ऊर्जा प्रकल्प, पवनचक्क्या, सूक्ष्म जलविद्युत प्रकल्प आणि अपारंपरिक ऊर्जेवर आधारित सार्वजनिक सुविधा यासारख्या अक्षय ऊर्जा प्रकल्पांना कर्ज पुरवठा करणे सुलभ होतं आहे. याद्वारे हवामान बदलाविरुद्धच्या देशाच्या लढ्याला आणखी गती मिळत असल्याचं मल्होत्रा यांनी सांगितलं.

**बैठक**

प्रधानमंत्री गतिशक्ती अंतर्गत नेटवर्क प्लॅनिंग गटाच्या 89व्या बैठकीत काल रस्ते, रेल्वे आणि मेट्रो क्षेत्रातल्या प्रमुख पायाभूत सेवा प्रकल्पांचं मूल्यांकन करण्यात आले. यात बदलापूर - कर्जत दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेच्या कामाचा आढावा घेण्यात आलां. यामुळं मुंबई-पुणे-सोलापूर मार्गावरची प्रवासी आणि मालवाहतुकीची कोंडी दूर व्हायला मदत होईल. तसंच बदलापूर, माथेरान, कर्जतसारख्या भागात राहणाऱ्या नागरिकांना मदत होईल.

**सुर्यघर-मुंबई**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आतापर्यंत 1 लाख 92 हजार 936 सौर उर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्रानं देशभरात दुसरं स्थान मिळवल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी 13 फेब्रुवारी पासून सुरु झालेल्या या योजनेत देशभरात 10 मार्च 2025 पर्यंत 10 लाख 9 हजार सौर उर्जा प्रकल्प बसवण्यात आले. या योजनेत महाराष्ट्र आपलं योगदान देत राहील तसंच 2026-27 पर्यंत 1 कोटी कुटुंबांपर्यंत ही योजना पोहोचवण्याचं उद्दिष्ट असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**विक्रमी उत्पन्न**

पुणे महापालिकेला चालू आर्थिक वर्षात, जानेवारी अखेर, आतापर्यंतचं विक्रमी म्हणजे 6 हजार 4शे कोटींपेक्षा अधिक उत्पन्न मिळालं आहे. मार्च अखेरपर्यंत त्यात आणखी वाढ होणार आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती मजबूत राहण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असल्याचं मुख्य वित्त आणि लेखा अधिकारी उलका कळसकर यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. त्या म्हणाल्या.....

**बीज तयारी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठ गमन अर्थात बीज सोहळा उद्या, रविवारी क्षेत्र देहू इथं होत आहे. यंदा तीनशे पंच्याहत्तरवा बीज सोहळा असून या सोहळ्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी देहू नगरपंचायतीकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. गावात स्वच्छतेची कामे करण्यात आली असून इंद्रायणी नदीतील जलपर्णी काढण्यात आली आहे. सध्या देहू, माळवाडी, विठ्ठलवाडी आणि इंद्रायणी नदीकाठी गाथा पारायण सोहळा आणि अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहेत. नगरपंचायत कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन केंद्र सुरू

करण्यात येणार असल्याची माहिती देहू नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी निवेदिता घार्गे यांनी दिली. पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड तर्फे देहू इथं जाण्यासाठी जादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**आजार मुक्तगावं-रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या 13शे तीन गावांमध्ये, गेल्या सलग तीन वर्षांमध्ये हिवताप अर्थात मलेरियाचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही. त्यामुळे ही गावं कीटकजन्य आजारमुक्त म्हणून घोषित करण्यात आली आहेत. नियमित सर्वेक्षण, उपाययोजना आणि आरोग्यशिक्षण या माध्यमातून जिल्ह्यातले सर्व आरोग्य कर्मचारी आणि अधिकारी करत असलेल्या एकत्रित प्रयत्नांतून हे साध्य झालं आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अनिरुद्ध आठल्ये यांच्यासह जिल्हा हिवताप अधिकारी डॉक्टर संतोष यादव आणि कर्मचाऱ्यांच अभिनंदन केलं आहे.

**जर्मन कोर्सबुक**

जर्मन भाषा मराठीतून शिकता यावी यासाठी बालभारतीने जर्मन कोर्सबुक म्हणून नुकतंच एक पुस्तक प्रकाशित केलं आहे. यामध्ये मूलभूत जर्मन भाषा मराठीतून शिकता येणार आहे.

**वीरमरण-कोल्हापूर**

कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील जवान सुनिल गुजर यांना सेवा बजावत असताना, मणिपूर इथं झालेल्या भूस्खलनात वीरमरण आले आहे. सुनील गुजर, पुण्याच्या बॉम्बे इंजीनियरिंग ग्रुपमध्ये प्रशिक्षण पूर्ण करून, भारतीय सैन्य दलात 2019मध्ये भरती झाले होते. त्यांचं पार्थिव शरीर आज रात्री पुण्यात आणण्यात येणार असून उद्या त्यांच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**निधन-पीतांबर सरोदे**

ज्येष्ठ साहित्यिक शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर पितांबर सरोदे यांचं अल्प आजारानं काल नंदुरबार इथं निधन झालं. ते 93 वर्षांचे होते. साने गुरुजींच्या विचारांचा पगडा असलेले गांधीवादी साहित्यिक म्हणून डॉक्टर पीतांबर सरोदे यांची ओळख होती. आकाशवाणीच्या जळगाव आणि धुळे केंद्रावरून पन्नासहून अधिक व्याख्यान आणि चर्चासत्रामध्ये सरोदे यांनी भाग घेतला होता.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ दिसून येत आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यात काल पारा 39 ते 40 अंशांच्या आसपास होता; सोलापुरातही काल तापमान 41 अंश सेल्सियसपर्यंत नोंदवलं गेल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. आज विदर्भात काळी ठिकाणी उष्णतेची लाट येईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**